Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – VI November - December 2021

# कोविड-१९ महामारीचे परिणाम

**प्रा. दिनेश साहेबराव खंडारे**
*कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे*

**प्रास्ताविक-**

आधुनिक काळात तंत्रज्ञान आणि जलद दळणवळण साधनातील आमुलाग्र प्रगतीमुळे जगातील देश व त्यातील लोक परस्परांच्या अगदी जवळ आले आहेत. म्हणजेच त्यातील अंतर कमी झाले आहे.त्यामुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील घटनेचे परिणाम क्षणात जगावर दिसून येतात. अशीच एक दुर्घटना म्हणजे कोविड-१९ होय. जगावर अनेक महामारींचे आक्रमण झाले त्यातील हा एक विषाणू आहे. स्पॅनिश फ्ल्यू, ब्युबेनिकप्लेग, एडस्, स्मॉलपॉक्स, टायफस, एन्फ्ल्युएन्झा A/H२N२/A/H३N२, कॉलरा, मलेरिया, क्षयरोग, पितज्वर, सार्स, बर्डफ्ल्यू, स्वाईनफ्ल्यु, हेपेटायटीस, एबोला. मेनेंजायटिस, झिका, लेप्टो स्पायरोसिस, डेंग्यू, चिकुन गुनिया,एम इ आर एस. अशा अनेक जिवधेण्या आजारांचा जगाने सामना केला.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

काहींवर औषधे शोधली गेलीत काहींवर नियंत्रण मिळविणे शक्य झालेतर काही आजार हे आजही औषधांच्या प्रतिक्षेत आहेत. अशाच एका आजाराशी आपण लढत आहोत. तो आहे कोविड-१९ याची प्रथम नोंद ३१ डिसेंबर २०१९ ला चिन मधील वुहान प्रांतात झाली. आणि तेथूनच त्याचा प्रसार झाला. आणि आजमितीस ह्या महामारीने जगभरातील ५,४१६,९९७ लोकांचा, भारतातील ४७९,९९७ लोंकांचा बळी घेतला व हे सत्र अजुनही सुरूच आहे. जगात ह्या रोगाने २७ करोड लोक, भारतात ३.४७ करोड लोक व महाराष्ट्रात १.४१ लाख लोक मृत्युमुखी पडले. ह्या बाबतीत महाराष्ट्र भारतात अग्रभागी आहे. याचा परिणाम समाजाच्या, राज्याच्या व जगाच्या प्रत्येक घटकावर /स्तरावर झालेला आहे. तसेच जगभरातील मानवी जिवन ढवळून निघाले आहे. त्याच्या आक्राळ विक्राळ स्वरूपाने मानवी मनात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. जगात अनेक बदल झाले आहेत.ज्याने ह्या रोगाला अत्यंत जवळून पाहीले किंवा अनुभवले तो व्यक्ति आज जिवंत नाही असे म्हणणे अतिशयोक्तिचे होणार नाही. जगातील आरोग्य प्रशासनावर ह्या रोगामुळे प्रचंड दबाव पडला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कोरोनामुळे विवीध क्षेत्रांवरील परिणाम दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने कोविड-१९ ला ११ मार्च २०२० रोजी महामारी म्हणून घोषित केले व २२ मार्च ला प्रथम संचारबंदी लागू करण्यात आली.

**उद्दीष्टे-**

१. कोविड-१९ चे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.

२. कोविड-१९ चे आरोग्यावरील व लोकसंख्येवरील परिणाम अभ्यासणे

**कोविड - १९ चे विविध परिणाम खालील प्रमाणे आहेत.-**

**शैक्षणिक परिणाम:-**

कोविड-१९ या रोगाच्या विषाणुचा प्रभाव व संसर्ग रोखण्यासाठी भारत सरकारने विद्यापिठे, शैक्षणिक संस्था व कोचिंग क्लासेस आदींवर संचारबंदी किंवा लॉकडाउन दरम्यान बंद ठेवण्याचे आदेश दिले. तसेच त्या केंव्हा सुरू होतील याबाबत अनिश्चितता निर्माण झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शाळेत जाणे बंद झाले. परिणामत: विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर नकारात्मक परिणाम झाला. विद्यार्थ्याला घरी राहूनच अभ्यास करावा लागला व शिक्षकांनासुध्दा घरुनच अध्यापन करावे लागले. यासाठी विविध मोबाइल ॲपचा वापर करावा लागला उदा. व्हॉटस्ॲप, झुम ॲप, टेलिग्राम, गुगल मिट, गुगल क्लासरुम इ. परंतु यासाठी इंटरनेटची उपलब्धता व मोबाइल/संगणक यांची आवश्यकता होती. यांच्याशिवाय ऑनलाइन शिक्षण अशक्य झाले. सधन पालकांकडे याची उपलब्धता होती पण गरीब पालकांकडे नव्हती. कोविड-१९ मुळे अध्ययन व अध्यापन पध्दतीत आमुलाग्र बदल झाल्याने विद्यार्थि, पालक व शिक्षकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. अपुऱ्या तांत्रिक सोयींमुळे अध्ययन व अध्यापन पक्रियेत अनेक अडथळे आलेत. विद्यार्थि व शिक्षक संवाद कमी झाला, त्यात यांत्रिकता येउन त्यातील सहजता लोप पावली जगभरातील विद्यापिठे बंद पडल्याने विद्यार्थि नैराश्याच्या गर्तेत सापडला. या महामारीमुळे शैक्षणिक क्षेत्रात ई-लर्निंग चा वापर वाढला व खडु फळ्याची जागा तंत्रज्ञानाने घेतली. या तंत्रज्ञानाचा कणाहा इंटरनेटची उपलब्धता होता याच्या अभावी ई-लर्निंग अशक्य होते.ऑनलाइन परिक्षा पध्दतीमुळे विद्यार्थ्यांचे मुल्यांकन होण्याच्या पारंपारिक पध्दतीला छेद दिला गेला. अचूक मुल्यांकन झाले नाही. परिक्षा न घेता वरच्या वर्गात पाठविण्यात आले. लॉकडाउन अचानक लागले. लॉकडाउन लागु होण्यापूर्वी विद्यार्थि व शिक्षक यांना ऑनलाइन शिक्षणाचे कोणतेही प्रशिक्षण देण्यात आलेले नव्हते. ते याबाबतीत अनभिज्ञ होते व ते त्यासाठी सज्जही नव्हते. ते त्यांनी स्वप्रयत्नांनी आत्मसात केले. त्याप्रकारचे शैक्षणिक साहित्य विकसित केले, शिक्षक सान्निध्यात शिकण्याची सवय असलेल्यांना दूरस्थ व ऑनलाइन शिक्षणात परकेपणा वाटला. अनेक अभ्यासक्रम हे वर्णनात्मक होते त्यात वस्तुनिष्ठतेचे प्रमाण कमी होते.पण परिक्षा वस्तुनिष्ठ घेण्यात आल्या त्यामुळे प्रश्नपत्रिका काढणे जिकीरीचे झाले. ऑनलाइन शिक्षणाचा सकारात्मक परिणाम म्हणजे भौगोलिक स्थानाचा अडथळा ह्यामुळे दूर झाला. विद्यार्थि कोठेही बसून अध्ययन करु लागला. त्यासाठी शाळा किंवा वर्गाची आवश्यकता त्याला भासली नाही. ऑनलाइन शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या सज्जतेसाठी काही विद्यापिठांनी अभ्यासक्रमातील काही भाग ऑनलाइन शिक्षणासाठी राखुन ठेवण्याची तयारी दर्शविली आहे. युनेस्कोच्या अहवालानुसार जगातील एकूण विद्यार्थि संख्येच्या ८७ % विद्यार्थि हे लॉकडाउनमुळे शाळा बंद

झाल्याने प्रभावित झाले. यात प्रामुख्याने अविकसित व विकसनशील देशांचा समावेश आहे. या देशांमध्ये रेडिओ, आय सी टी वर्ग, दूरदर्शन, संगणक, स्मार्टफोन, स्मार्ट टि व्ही, इंटरनेट ची जोडणी व त्यातील सातत्य या साधनांचा अभाव आहे. युनेस्कोच्या मते १९५ देशातील १.५ अब्जाहून अधिक विद्यार्थ्यांना शाळेपासून वंचित राहावे लागले.शाळा व महाविद्यालयांच्या सत्रांमध्ये व कालावधीमध्ये बदल झालेत. खाजगी शाळा बंद झाल्याने पालकांनी शुल्क भरण्याकडे पाठ फिरविल्याने शाळांचे उत्पन्न थांबले.परिणामत: शिक्षकांचे वेतन थांबलेत त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली, व अशा विमनस्क मानसिक अवस्थेत त्यांना ऑनलाइन अध्यापन करावे लागले. तसेच शाळा-कॉलेजेस बंद असल्याने विकसनशील व अविकसित देशांतील विद्यार्थ्यानी रोजगार शोधण्यावर भर दिला.त्यात शेतिपुरक कामांचा समावेश होतो.

**आर्थिक परिणाम :-**

कोविड-१९ मुळे लागू झालेल्या लॉकडाउनमुळे जगातील लाखो उद्योगधंदे बंद पडले परिणमत: लाखो कामगार बेरोजगार झाले. बेरोजगारीमुळे लाखो कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाची समस्या निर्माण झाली, बरेच उद्योगधंदे तर आपले अस्तित्वच गमावून बसले आहेत. जगात ३.३ अब्ज कर्मचारी आहेत. त्यातील अर्धे कर्मचाऱ्यांसमोर आपला रोजगार गमावण्याचे संकट उभे ठाकले आहे. ह्या शिवाय असंघटित उद्योगातील कामगारांसमोर असुरक्षिततेची समस्या आहे. कारण त्यातील बहुतांश कामगारांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. लॉकडाउनमुळे उत्पादन साधने गमावल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांच्यासमोर उद्‌भवला आहे. लॉकडाउनमुळे जिल्ह्यांच्या, राज्यांच्या व देशांच्या सिमा बंद केल्यामुळे कृषि व्यवसाय अडचणीत आला. त्यामुळे कृषि उत्पादने जनतेपर्यंत न पोहोचल्याने आहारात पौष्टिक अन्नाची कमतरता आढळली. कुटुंबातील कमावत्या व्यक्तिचा मृत्यू झाल्याने तसेच त्यावर करण्यात आलेल्या वैद्यकिय उपचाराच्या खर्चामुळे लाखो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली. त्यामुळे अनेकांना असुरक्षित व जोखिमिची कामे करावी लागली व ती सुरु ठेवण्यास भाग पडले आणि आरोग्य धोक्यात घालावे लागले. वाहतुकिच्या साधनांवरील निर्बंधांमुळे व्यापार कुंठित झाला. पर्यटन व्यवसाय, ट्रान्सपोर्ट व प्रवासी वाहतुक व्यवसाय धोक्यात आला. वाहतुक व्यवसायाशी निगडित अनेक व्यवसाय अडचणीत आले उदा. वाहन दुरुस्ती केंद्रे, पेट्रोल-डिझेल व्यवसाय, वाहनविक्री इ. लॉकडाउनमुळे महानगरातील कामगारांनी रोजगार गमावल्याने त्यांनी मुळ गावी जाणे पसंत केल्यानेते ज्या ठिकाणाहून स्थलांतरित झाले तेथे अनेक समस्या निर्माण झाल्या स्थलांतर केल्याच्या गावी मजूरांची कमतरता भासली तर स्थलांतर झाल्याच्या गावातील सोयी सुविधांवर अतिरिक्त ताण पडला. स्थानिक अर्थव्यवस्थेवर ताण पडुनसोयी सुविधा, रोजगार इ. बाबींचा तुटवडा निर्माण झाला. कोविड-१९ मुळेकामकरी लोकांच्या वर्गावर गंभीर परिणाम झालेत.त्यांची नोकरीगेली, मृत्युमुखी पडले,जे वाचले त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. उपचारांवर खर्च झाल्याने कामगार अडणीत आला तसेच लॉकडाउनमुळे बरोजगार झाल्याने आर्थिक विवेंचना तिव्र झाली.हे स्वरुप प्रामुख्याने आपल्याला अविकसित व विकसनशील अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये दिसून येते

लॉकडाउन शिथिल झाले असले तरी आर्थिक विवंचनेमुळे नव्याने व्यवसायात गुतवणुक करणे कठीण झाले आहे. त्यामुळे मागणी व पुरवठा यांच्यात विसंगति येते अर्थव्यवस्था प्रभावित होते ज्यात उत्पन्न घटते, उत्पादन घटते, दैनंदिन वस्तुंचा उपभोग वाढतो. गुंतवणुक घटते, वस्तुंची मागणी घटते. लॉकडाउनमुळे बरेचसे कर्मचारी वर्क फ्रॉम होम करु लागल्यानेही नवीन पध्दती कोविड-१९ मुळे रुजण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. लॉकडाउनमुळे बाजारपेठ बंद असली तरी काही जिवनावश्यक वस्तुंच्या वाहतुक व वितरणाला परवानगी होती उदा. दुध, फळे,भाजीपाला, किराणा, औषधे इ. यामुळे कोविड-१९ चा या व्यवसायावर फारसा परिणाम दिसून आला नाही. पण वाहतुक बंदिमुळे ऑनलाइन बाजारपेठ ठप्प झाली होती. ऑनलाइन कामे वाढल्याने ब्रॉडबँडचा वापर मोठया प्रमाणात वाढला. कोविड-१९ चा वैद्यकिय व औषध व्यवसायावर मोठा परिणाम झाला त्यात लाइफ सेव्हिंग ड्रग्ज, वैद्यकिय उपकरणे (व्हेंटिलेटर, ऑक्सीमिटर) ऑक्सिजन प्लांट, पी पी इ किट इ. चा तुटवडा भासला व त्यांची कमतरता भरुन काढण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे भारतामध्ये हजारोच्या संख्येने व्हेंटिलेटर व ऑक्सिजन प्लांट उभारले गेले. वाहतुक व्यवसायात मंदि आल्याने भारताची इंधन तेलाची आयात कमी झाली त्यामुळे कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या. कोविड-१९ मुळे भारतीय अर्थव्यवस्थेत घसरण दिसून आली. सरकारचा महसूल वाढावा यासाठी मद्य विक्रिवरील बंदि शिथिल केली. या रोगामुळे जगातील विमान व रेल्वे वाहतूक तसेच बांधकाम व्यवसायावर विपरित परिणाम झाला.

**मानवी आरोग्यावरील परिणाम:-**

कोविड-१९ च्या संकटामुळे जगातील मानवजाती समोर अनेक संकटे उभी राहीली आहेत. त्यात महत्वाचे संकट म्हणजे मानवी आरोग्यावर झालेले विपरित परिणाम तसेच मृत्यूचे भय होय. ह्या रोगामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडलेत तर जे ह्या रोगाची लागण होउन जिवंत राहीलेत त्यांच्यावर झालेल्या औषधोपचाराचे तसेच ह्या विषाणुमुळे अनेक साइड इफेक्टस् झालेत व त्यामुळे शरीरात अनेक गुंतागुंत निर्माण झाल्या तसेच त्यांच्या प्रतिकार शक्तिवर देखील दुष्परिणाम झाला. जिवंत वाचलेल्या रुग्णांना म्युकरमायसिस सारखे आजार झालेत व त्यात अनेकांना जिव सुध्दा गमावावा लागला. कोविड-१९ मुळे कौटुंबिक उदरनिर्वाहाची समस्या निर्माण होउन कुपोषणासारखी समस्या दिसून आली.ज्याचे प्रमाण ६९० दशलक्ष होते ते १३२ दशलक्षाने वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. उत्पादन साधने गमावल्याने साधारण दर्जाचे अन्न सेवन केल्याने म्हणजेच पौष्टिक अन्नाच्या अभावी कुपोषण समस्या उद्‌भवली व तिव्र बनली आहे.

कोविड-१९ मुळे रुग्णांवर वैद्यकिय उपचार करणाऱ्या डॉक्टर, नर्सेस व वैद्यकिय व्यवसायातील इतर घटकांना अनेक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागले. त्यांना रुग्णांमुळे झालेले कोरोनाचे संक्रमण, अथक दिर्घकाळ सलग ड्युटि करणे आरामाचा अभाव, स्वत:मुळे परिवाराला कोरोनाची लागण, घरापासुन दुर राहणे, दिर्धकाळ पी पी इ किटमध्ये राहणे, वारंवार जंतुनाशकांचा वापर इ. समस्यांना

सामोरे जावे लागले. कोविड-१९ मुळे लोकसंख्येच्या आयुर्मानावरील परिणामांचे अध्ययन अजून चालू आहे. त्यात अजून निष्कर्षाप्रत आलेले नाही. पण देशांच्या सरासरी आयुर्मानावर याचा निश्चितच परिणाम झाला आहे. या रोगाने वृध्द लोकसंख्येचा मोठ्या प्रमाणात बळी घेतलात्यामुळे जगाच्या सरासरी आयुर्मानात घट झाली. कोविड-१९ मुळे जागतिक अतिरिक्त मृत्यूची संख्या कमीत कमी ३० लाख इतकी आहे.

कोविड-१९ मुळे मनुष्य आरोग्याप्रति जागरुक होउन गर्दिच्या ठिकाणी न जाणे, हस्तांदोलन टाळणे शारीरीक अंतर राखणे, नियमितपणे जंतुनाशकाने हात धुणे, नाकातोंडावर मास्क लावणे, संक्रमणाच्या चाचण्या करणे इ. प्रकारचे बदल मानवी वर्तनात दिसून आले.कोविड-१९ चा विषाणू चिनमधून जगात पसरला ह्या विषाणुमुळे प्रामुख्याने फुफ्फुस निकामी होते परिणामी न्युमोनिया होउन किडनी, हृदय व यकृत इ. ना इजा पोहोचते. तसेच मानवी शरीराची प्रतिकार क्षमता कमी होते. मानवी शरीरातून नाका तोंडावाटे उत्सर्जित झालेल्या जलकणांमुळे हा रोग इतरांना संक्रमित करतो. हा विषाणू श्वासाद्वारे नाकातून अथवा तोंडातून शरीरात प्रवेश करतो व श्वसनासंबंधी तिव्र वेदना व अडथळा निर्माण करतात. तसेच सर्दी, कोरडा खोकला, घसा खवखवणे, ताप, थकवा हे या रोगाचे मानवी शरीरावरील घातक परिणाम आहेत. कोविड-१९ चा परिणाम मधुमेह,उच्च रक्तदाब व किडनीचे आजार असणाऱ्यांची प्रतिकारशक्ति कमी असल्याने त्यांच्यावर घातक परिणाम करतो. लॉकडाउनमुळे संचारबंदि झाली त्यामुळे नागरिकांना एकांतवासात जिवन जगावे लागले. त्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम झाला. व्यायामशाळा, क्रिडांगणे बंद असल्याने त्याचा त्यांच्या आरोग्यावर अयोग्य परिणाम झाला व त्यांचे आरोग्य बिघडले.

**सामाजिक परिणाम:-**

कोविड-१९ ही विश्वव्यापी महामारी/आपत्ती आहे. त्यात भारतही आहेच. याचा प्रतिबंध करण्यासाठी सामाजिक अंतर आणि संपर्क टाळण्यावर भर देण्यात आला. समाजातील व्यक्ति परस्परांपासून दूर गेले त्यामुळे मानवा मानवातील संवाद कमी झाला. सामाजिक कार्यक्रमांवर बंदि लादली गेली. मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत विवाह, अंत्य संस्कारांसारखे कार्यक्रम पार पाडले गेले. अनेक रुढी परंपरांना छेद देत कार्यक्रम पार पाडण्यात आले.सरकारने लागू केलेल्या लॉकडाउनला समाजातील सर्वांनीच पाठींबा दिला नाही. काहींनी विरोधही केला. प्रसंगी पोलिस प्रशासन आणि जनता यांच्यात संघर्ष पाहायला मिळाला. पोलिसांना सक्ति करावी लागली सौम्य हिंसा करावी लागली. नागरीकांच्या मंदिर प्रवेशाला बंदि करण्यात आली धार्मिक उत्सव बंद केले. धार्मिक व सामाजिक मिरवणुकांवर बंदि लादली गेली.समाजात कोरोना योध्द्यांच्या विरोधात भूमिका दिसून आली. त्यांच्या बद्दल कृतज्ञता दाखविण्याऐवजी संसर्ग होइल या भितीने त्यांना घृणा सहन करावी लागली. त्यांच्या कुटुंबाला आकस सहन करावा लागला. ही परिस्थिती गृहनिर्माण सोसायट्या व अपार्टमेंटमध्ये दिसून आली. बहिष्काराचा सामना करावा लागला. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या घर मालकांनी भाड्याची घरे रिकामी करण्याचा तगादा लावला. डॉक्टर व

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – VI November - December 2021

पोलीसांना हल्ले सहन करावे लागले. मोफत अन्न वाटपाच्या ठिकाणी गरीबांचे आपापसांत भांडतांनाची दृश्ये दिसली. समाजातील अनेक दानशूर व्यक्तिंनी गरजूंना अन्नदान केले, सुरक्षित ठिकाणी जाण्यास सहाय्य केले. समाजात प्रबोधन करणे, सॅनिटायझर वाटप, मास्क वाटप असे उपक्रम दिसून आले. या उलट समाजातील काही नफेखोरांनी कृत्रिम टंचाइ निर्माण करुन जिवनावश्यक वस्तुंची दुप्पट किंमतीने विक्रि केली. औषधांची काळा बाजारात विक्री करण्यात आली. समाजातील अजून एक घटक म्हणजे देहविक्रय करणाऱ्या वारांगणांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यांना पर्यायी व्यवसाय शोधावा लागला. समाजातील प्रत्येक घटकाने आपापली जबाबदारी ओळखून शासनाला सहकार्य करावे ही शासनाची व समाजाचीही अपेक्षा आहे. जिविताचे महत्व खालील संस्कृत श्लोक विषद करतो त्यात संपत्ती, मित्र,पत्नी आणि राज्य यांची पुर्नप्राप्ती होते पण देहाची नाही.

पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही ।
एत्सर्व पुनर्लभ्य न शरीरे पुन्हा पुन्हा ॥

सरकारने ह्या रोगाचा प्रतिकार करण्यासाठी अनेक लसिंना मान्यता दिली आहे पण समाजाने त्यांच्यावर अविश्वास दाखविला व त्यापासून दूर राहणेच पसंत केले. पण त्यात उत्तरोत्तर लस घेणा-यांची संख्या वाढत आहे. लसिं विरुध्द समाजात अफवा पसरल्या व त्यावर प्रबोधन करण्यात आले. रोगाच्या कारणांची, परिणामांची व लक्षणांची माहीती समाजाला देण्यात आली काहींनी त्याकडे पाठ फिरविली तर काहींनी उत्सुकता दाखविली. समजात अनेक प्रकारचे लोक राहतात. त्यात वृध्द अपंग, गरीब, तरुण, सामाजिकदृष्ट्या मागासलेले, कुपोषित असे अनेक असतात. त्यातील बऱ्याच जणांकडे पक्की घरे, सकस आहाराची व्यवस्था नसते. त्यामुळेते या कोविड-१९ च्या विषाणू पासून सुरक्षित राहू शकत नाही. महानगरात स्थ्रलांतरीतांकडे निवारा नसल्याने बेघर बनून उघड्यावर राहायला मजबूर असतात. लॉकडाउनमुळे समाजातील लोकांच्या दिनचर्येवर परिणाम झाला. त्यात खाण्या पिण्याच्या सवयी, झोपेची वेळ इंटरनेटचा अतिवापर, परस्परांपासून अलिप्त राहणे इ. सद्य:स्थितित समाज आगामी संभाव्य कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेच्या आगमनाने भयभित झाला आहे.

**<u>लोक संख्येवरील परिणाम:-</u>**

२०२० च्या आकडेवारीनुसार युरोप आणि अमेरिकेतील जन्मदर घटला आहे.१९४१ च्या नंतर पहिल्यांदा जन्मदरात इतकी घट दिसून येत आहे. त्यात फ्रान्स, इंग्लंडवेल्स, स्कॉटलँड व इटली यांचा समावेश आहे. साथीच्या रोगांमुळे स्त्रिया बाळंतपण टाळत आहेत. गरोदर स्त्रियांना नियमितपणे हॉस्पीटलची सेवा घ्यावी लागते व हॉस्पीटल्स ही साथीच्या रोगाचे माहेरघर असण्याची दाट शक्यता असते. नवजात बाळाला सुध्दा नियमीत हॉस्पीटलची सेवा घ्यावी लागते. त्यामुळे गर्भधारणा टाळली जाते. विवाहांचे नियोजन टाळले जाते. तसेच प्रजननक्षम लोकसंख्या कोविड-१९ ने संक्रमित झाली काही मृत्युमुखी पडल्याने जन्मदर कमी झाला. या रोगामुळे व्यक्तिवरील शारीरीक व मानसिक ताण वाढला,

रोजगार व उत्पन्नात घट झाली, आर्थिकमंदि यांचा प्रभाव जन्मदर घटण्यावर झाला. लॉकडाउनमुळे कुटुंबे दिर्घकाळ घरातच राहीलीत पण तरीही जन्मदर वाढला नाही कारण या काळात गर्भनिरोधक (कंडोम्स) साधनांची विक्रमी विक्री झाली लॉकडाउनमुळे लोकसंख्येचे देशांतर्गत व राज्यांतर्गत स्थलांतर झाले. त्यामुळे विवीध ठिकाणच्या लोकसंख्येच्या घनतेवर कमी अधिक परिणाम झाला. बहुसंख्य कामगारांचे रोजगार गमावल्याने त्यांनी आपल्या मुळ गावी जाणे पसंत केले परिणामी तेथील लोकसंख्या वाढली. लोकसंख्या वाढीवर विपरित परिणाम करणारी महत्वाची बाब म्हणजे या रोगामुळे लाखोने लोकसंख्या मरण पावली त्यामुळे जन्मदर कमी व मृत्युदर जास्त अशी समस्या झाली.

**निष्कर्ष :-**

कोविड-१९ ही महामारी वैश्विक समस्या बनली आहे.तिला लवकर नियंत्रणात आणणे अत्यंत आवश्यक आहे.मानवी जिवनाच्या प्रत्येक घटकाला या रोगाने प्रभावित केले आहे. जगाचा विकास मंदावला आहे. अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वैद्यकिय क्षेत्राच्या मर्यादा निदर्शनास आल्या. आरोग्य सेवा तोकड्या ठरल्या त्यात भरघोस वाढ करणे आवश्यक आहे. ही व अशा प्रकारच्या कोणत्याही समस्येला सज्ज राहणे आवश्यक आहे.

**संदर्भसूचि**

Journals.sagepub.com
google.com
worldometers.info
timesofindia.indiatimes.com
link.springer.com
who.int
sciencedirect.com
ncbi.nim.nin.gov
researchgate.net
sersc.org
scirp.org
thebridgechronicle.com
internationalhealthpolicies.org
un.org
www.jehp.net
www.orfonline.org
rand.org
en.wikipedia.org